**<u>नियमित दिवाणी दावा क्र. २२३/१९७५ मध्ये निशाणी क्र. ३०० कडील अर्जावर आदेश.</u>**

१) प्रस्तुतचा अर्ज वादींतर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ६, नियम १७ मधील तरतुदींनुसार वादपत्रामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२) वादींच्या प्रस्तुत अर्जातील कथनानुसार दावा दाखल करतेवेळी दावा मिळकतीचा मौजे बेलवडे बुद्रुक येथील सर्व्हे क्र. १३३ असा होता व क्षेत्र १ एकर ३५ गुंठे इतके होते. परंतु त्यानंतर गट एकत्रीकरणात दावा मिळकतीचा सर्व्हे क्र. १३३ ला नवीन गट क्र. ५४४ देण्यात आला आहे व त्याचे क्षेत्र ०–७७ आर असे नमुद करण्यात आले आहे. वादी हे प्रस्तुत दावा दुरुस्तीच्या अर्जाद्वारे दावा कलम १अ मध्ये दावा मिळकतीच्या वर्णनामध्ये दावा मिळकतीच्या सर्व्हे क्र. १३३, क्षेत्र १ एकर ३५ गुंठे ऐवजी गट क्र. ५४४, क्षेत्र ०–७७ आर असे नमुद करुन तशी दुरुस्ती करु इच्छीत आहेत.

३) वादी हे प्रस्तुत दावा दुरुस्तीच्या अर्जाद्वारे वादपत्रामध्ये परिच्छेद क्र. ३ नंतर नवीन परिच्छेद क्र. ३अ समाविष्ट करुन त्यामध्ये प्रतिवादी क्र. २ ने या कामी खोटी व लबाडीची कैफियत देवून प्रतिवादी क्र.२ हा प्रतिवादी क्र.१ चे कुळ असल्याबाबत कथन केलेबाबतचा मजकूर व तसेच न्यायालयाने काढलेल्या मुद्यांमधील मुद्या क्र. २ हा वादीच्या मागणीच्या अनुषंगाने विसंगत असल्याबाबतचा मजकुर समाविष्ट करु इच्छीत आहेत.

४) प्रतिवादी क्र. २ च्या वारसांतर्फे प्रस्तुत अर्जास दिलेल्या निशाणी क्र. ३०५ कडील म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, मौजे बेलवडे बुद्रुक या गावी सन १९८५ पुर्वी गट योजना झाली असुन शासनाने त्याचे रेकॉर्ड तयार केले आहे. वादींना त्यावेळेस पासुन त्याची माहिती आहे. असे असताना वादींनी सुमारे ४० वर्षांनी दुरुस्तीची मागणी का केली याचे समर्थनीय कारण

दिले नाही. तसेच वादी हे दाव्यात परिच्छेद क्र. ३अ म्हणुन जो मजकुर सामिल करायची मागणी करत आहेत ते वादींचे कृत्य लबाडीचे व पुर्वीच्या वागणुकीशी विसंगत आहे. प्रतिवादी क्र. २ च्या वारसांनी वादीचा सदर दावा दुरुस्तीचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

५) प्रस्तुत अर्जाच्या कामी वादींच्या व प्रतिवादी क्र. २ च्या वारसांच्या विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

६) दोन्ही पक्षातील विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला असता व रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसुन येते की, वादींनी प्रस्तुतचा दावा हा दावा मिळकत गहाण मुक्त करुन तिचा प्रत्यक्ष कब्जा वादींना मिळण्याकरीता केला आहे. प्रस्तुत प्रकरणात निशानी क्र. ७३ कडे वादाचे मुद्दे निश्चित करणेत आले आहेत. वादींनी अद्याप पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केल्याचे दिसून येत नाही. प्रस्तुत दावा सन १९७५ सालामध्ये दाखल केला आहे व त्यानंतर मौजे बेलवडे बुद्रुक, ता. कराड येथे गट एकत्रीकरण होऊन सदर गट एकत्रीकरणात दावा मिळकतीस सर्व्हे क्र. १३३ ऐवजी नवीन गट क्र. ५४४ देण्यात आला आहे व त्याचे क्षेत्र १ एकर ३५ गुंठे ऐवजी ०–७७ आर असे नमुद करण्यात आले आहे ही बाब विचारात घेता व तसेच प्रस्तुत प्रकरणात अद्याप वादींचा पुराव सुरू झाला नाही ही बाब विचारात घेता व दाव्याचे स्वरुप विचारात घेता माझ्या मते वादींनी या अर्जामध्ये दावा कलम १अ मध्ये दावा मिळकतीच्या वर्णनामध्ये दावा मिळकतीच्या सर्व्हे क्र. १३३, क्षेत्र १ एकर ३५ गुंठे ऐवजी गट क्र. ५४४, क्षेत्र ०–७७ आर असे नमुद करुन तशी दुरुस्ती करण्यास परवानगी मिळण्याची केलेली विनंती समर्थनीय आहे.

७) वादी हे प्रस्तुत दावा दुरुस्तीच्या अर्जाद्वारे वादपत्रामध्ये परिच्छेद क्र. ३

नंतर नवीन परिच्छेद क्र. ३अ समाविष्ट करुन त्यामध्ये प्रतिवादी क्र. २ ने या कामी खोटी व लबाडीची कैफियत देवून प्रतिवादी क्र.२ हा प्रतिवादी क्र.१ चे कुळ असल्याबाबत कथन केलेबाबतचा मजकूर व तसेच न्यायालयाने काढलेल्या मुद्यांमधील मुद्या क्र. २ हा वादीच्या मागणीच्या अनुषंगाने विसंगत असल्याबाबतचा मजकुर समाविष्ट करु इच्छीत आहेत. माझ्या मते प्रतिवादींनी त्यांची कैफियत दाखल केल्यानंतर सदर प्रतिवादींनी दिलेली कैफियत खोटी व लबाडीची आहे व प्रतिवादींनी त्यांच्या कैफियतीमध्ये खोटी व लबाडीची कथने केली आहेत असा मजकूर वादपत्रामध्ये समाविष्ट करुन तशी वादपत्रामध्ये दुरुस्ती करण्याची कोणतीही आवश्यकता नाही. तसेच माझ्या मते न्यायालयाने वाद मुद्ये निश्चित केल्यानंतर सदर वाद मुद्ये हे वादीच्या मागणीला विसंगत आहेत असा मजकूर वादपत्रामध्ये समाविष्ट करुन तशी वादपत्रामध्ये दुरुस्ती करण्याची कोणतीही आवश्यकता नाही. वादींनी त्यांच्या वादपत्रामध्ये नविन परिच्छेद क्र. ३अ समाविष्ट करुन त्यामध्ये प्रतिवादींच्या कैफियतीमधील कथनांबाबत व न्यायालयाने काढलेल्या वाद मुद्याबाबतचा मजकुर समाविष्ट करुन करु इच्छीत असलेली प्रस्तावीत दुरूस्ती ही प्रस्तुत दाव्यातील वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णीत करण्याच्या दृष्टीने आवश्यक नाही. त्यामुळे वरील नमूद सर्व कारणांचा विचार करता माझ्या मते वादींनी दाखल केलेला प्रस्तुतचा अर्ज अंशत: मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, हे न्यायालय न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आ दे श

१) प्रस्तुतचा अर्ज खालीलप्रमाणे अंशत: मंजूर करण्यात येतो.

२) वादींनी प्रस्तुत अर्जाच्या परिच्छेद क्र. ४ मध्ये विनंती केल्याप्रमाणेची दावा मिळकतीच्या बदललेल्या गट क्रमांक, क्षेत्र व आकार याबाबतची योग्य ती दुरुस्ती वादपत्रामध्ये या आदेशाच्या

दिनांकापासून १४ दिवसांच्या आत करावी व त्यानंतर दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

३) या अर्जाचा खर्च ज्याचा त्याने सोसण्याचा आहे.

४) वरीलप्रमाणे न्यायालयात आदेशाचे कथन करुन घोषीत करण्यात आला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PANDURANG LIMBAJI GHULE
Date: 2026.02.09 16:48:40 +0530

दिनांकः– ०९/०२/२०२६ (पां. लिं. घुले)

ठिकाणः– कराड २रे सह दि. न्या. व. स्तर, कराड.